| Publication : Saamana | Edition : Pune |
|---|---|
| Date : September 03, 2018 | Page: 11 |

# हिल हाफ मॅरेथॉनमध्ये इथिओपियाचा बोलबाला

## हिंदुस्थानी गटात आदिनाथ भोसले प्रथम; महिलांत जनाबाई हिरवे तृतीय

सातारा : शारीरिक क्षमतेचा कस लागणाऱ्या सातव्या सातारा हिल हाफ मॅरेथॉनमध्ये यंदाही पुरुष आणि महिला गटात इथिओपियाच्या धावपटूंचा बोलबोला राहिला. पुरुष गटात सिकियास अबात याने, तर महिला गटात अबिबेज गेला हिने बाजी मारली.

इथिओपियाच्या सिकियास अबात याने १ तास ७ मिनिटे व ५७ सेकंदांत अंतर पार करून पुरुष गटात (इलाइट ऑपन) प्रथम क्रमांक पटकावला, तर इथिओपियाच्याच ऑडिलॉडिल्यू मॅमोने १ तास ९ मिनिट व १४ सेकंदांत दुसरा, तर केनियाच्या जॉन सेलेलने १ तास १० मिनिटे आणि २७ सेकंदात हाफ मॅरेथॉन पूर्ण करून तिसरा क्रमांक पटकावला.

इलाईट ओपन महिला गटात इथिओपियाच्या अबिबेज गेला हिने १ तास २० मिनिटे आणि १ सेकंदात हिल हाफ मॅरेथॉनचे २१ किलोमीटरचे अंतर पार करून प्रथम क्रमांकावर नाव कोरले. केनियाच्या प्रास्कालिया चिपकोगेल हिने




१ तास २१ मिनिटे आणि ३२ सेकंदांत अंतर पार करत दुसरा क्रमांक पटकावला, तर इथिओपियाच्या मेसरेट बिरू हिने १ तास २२ मिनिटे आणि १७ सेकंदांत २१ कि. मी.चे अंतर पार करून तिसरे स्थान मिळविले.

हिंदुस्थानी गटात पुरुषांमध्ये मांढरदेव, तालुका वाई येथील आदिनाथ भोसले याने १ तास १७ मिनिटे ९ सेकंदांत हिल हाफ मॅरेथॉनचे अंतर पार करून प्रथम क्रमांक पटकावला. खिंडवाडी, ता. सातारा येथील स्वप्नील सावंत याने १ तास १७ मिनिटे १९ सेकंदांत अंतर पार करून दुसरा, तर पालघर येथील काशिनाथ गोरे याने १ तास १८ मिनिटे व ४१ सेकंदांत २१ कि. मी.चे अंतर पार करून तिसरा क्रमांक पटकावला. हिंदुस्थानी महिला गटामध्ये पुण्याच्या मनीषा साळुंखे हिने १ तास ३५ मिनिटे व ३२ सेकंद वेळेसह हिल हाफ मॅरेथॉन जिंकली. प्रियंका चावरकर हिने १ तास ३६ मिनिटे १० सेकंद वेळेसह दुसरा क्रमांक पटकाविला. दरवर्षी महिला गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या मांढरदेव येथील जनाबाई हिरवे हिला १ तास ३७ मिनिटे आणि ५६ सेकंद वेळेसह तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

### शर्यतीत ७ हजार पुरुष-महिला धावपटूंचा सहभाग

▪ सातारा येथील प्रसिद्ध धन्वंतरी डॉ. संदीप काटे यांनी २०१२ साली दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड्स मॅरेथॉनच्या धर्तीवर सातारा हिल हाफ मॅरेथॉनची संकल्पना मांडली. रविवारी सातारा हिल हाफ मॅरेथॉनच्या सातव्या पर्वामध्ये जगभरातून सुमारे ७ हजार पुरुष-महिला धावपटू सहभागी झाले होते. दरवर्षीप्रमाणे येथील पोलीस कवायत मैदानाऐवजी या स्पर्धेची सुरुवात तालीम संघ मैदानापासून करण्यात आली. या स्पर्धेचा साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रराजे भोसले, जिल्हाधिकारी श्वेता सिंघल, जिल्हा पोलीसप्रमुख पंकज देशमुख यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. हिल हाफ मॅरेथॉनला सकाळी ६ वाजून २ मिनिटांनी सुरुवात झाली होती.